


# आर.टी.ई.२५ % ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया (वर्ष:-२०२२-२०२३)

## प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे.

टीप:- आर.टी.ई. २५ % online प्रवेशाकरिता लागणारी सर्व कागदपत्रे ही पालकांनी online प्रवेश अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंतचीच असावीत त्यानंतरची कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कागदपत्राचा प्रकार | वैध कागदपत्रांची सूची |
|---|---|---|
| १ | रहिवासाचा/ वास्तव्याचा पुरावा (सर्व प्रवेशपात्र बालकांकरिता) | रेशनिंग कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स (वाहन चालविण्याचा परवाना) वीज/ टेलिफोन बिल देयक, पाणी पट्टी, प्रॉपर्टी टॅक्स देयक/ घरपट्टी, फक्त राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक ,आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट .या पैकी कोणतेही एक. निवासी पुराव्याकरिता Gas बुक रद्द करण्यात आलेले आहे. ही कागदपत्रे निवासी पुरावा म्हणून नसतील तरच दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनामा हा निवासी पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. |
| २ | वंचित जात सवर्गातील असल्यास जात प्रमाणपत्र (वडिलांचे/बालकाचे ) | उत्पन्नाच्या दाखल्याची आवश्यकता नाही. तहसीलदार/ उपजिल्हाधिकारी/उपविभागीय महसूल अधिकारी यांचे जात प्रमाणपत्र.पालकाचा (वडिलांचा/बालकाचा)जातीचा दाखला आवश्यक . परराज्यातील जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही. |
| ३ | दिव्यांग असल्यास आवश्यक कागदपत्रे | जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधीक्षक, अधिसुचित जिल्हा शासकीय रुग्णालय यांचे ४० टक्के आणि ४०% पेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र. |
| ४ | HIV बाधित/प्रभावित असल्यास आवश्यक कागदपत्रे | जिल्हा शल्य चिकित्सक /वैद्यकीय अधीक्षक ,अधिसूचित जिल्हा शासकीय रुग्णालय यांचे प्रमाणपत्र |
| | | तहसीलदार दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र,salary स्लीप,कंपनीचा किंवा Employer चा |

| | | |
|---|---|---|
| ५ | आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्यास उत्पन्नाचा दाखला | दाखला, (आर्थिक वर्ष २०२०-२०२१ किंवा २०२१-२०२२ मार्च अखेरचे एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेले)<br>उत्पन्नाचा दाखला हा परराज्यातील ग्राह्य धरण्यात येणार नाही . |
| ६ | जन्माचा दाखला<br>(सर्व प्रवेशपात्र बालकांकरिता) | ग्रामपंचायत /न.पा./ म.न.पा. यांचा दाखला / रुग्णालयातील ANM रजिस्टर मधील दाखला / आंगणवाडी / बालवाडीतील रजिस्टर मधील दाखला / आई,वडील अथवा पालकांनी प्रतिज्ञा पत्राद्वारे केलेले स्वयंनिवेदन. |
| ७ | घटस्फोटित महिला असल्यास आवश्यक कागदपत्रे | 1)न्यायालयाचा निर्णय.<br>२)घटस्फोटित महिलेचा/ बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.<br>३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला. |
| ८ | न्यायप्रविष्ट असलेल्या घटस्फोटा प्रकरणातील महिला असल्यास आवश्यक कागदपत्रे | 1)घटस्फोटाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा पुरावा.<br>२)घटस्फोट प्रकरण न्यायप्रविष्ट असलेल्या महिलेचा/ बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.<br>३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला. |
| ९ | विधवा महिला असल्यास आवश्यक कागदपत्रे | 1)पतीचे मृत्यूपत्र (प्रमाण पत्र)<br>२) विधवा महिलेचा /बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.<br>३)बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाण पत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला. |
| १० | एकल पालकत्व असल्यास (single parent) आवश्यक कागदपत्रे | आई किंवा वडील या पैकी निवडलेल्या व्यक्तीची कागदपत्रे ग्राह्य . |

| | | |
|---|---|---|
| ११ | अनाथ बालके असल्यास आवश्यक कागदपत्रे | १)बालगृह/अनाथ बालकांच्या बाबतीत अनाथालयाची कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत.<br>२)जर बालक अनाथालयात राहत नसेल तर जे पालक त्याचा सांभाळ करतात त्यांचे हमीपत्र आवश्यक राहील |

